
बालपण
सनहा पठाण

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# बालपण

लेखिका : सनहा पठाण

# बालपण

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# बालपण

लेखिका :सनहा शब्बेकदीर पठाण

मु .पो . पिलीव ( कलमवाडी) ,तालुका - माळशिरस , जिल्हा - सोलापूर

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 7774044414

sanaha.pathan@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ ऑगस्ट २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखिकेची ओळख



मला लिखाणाची आवड लहानपणापासून असून मी बरेच छोटे मोठे लेख आणि भरपूर साऱ्या विषयावर बऱ्याच कविता लिहिल्या आहेत पण त्या कधी कुठे प्रकाशित नाही केलं. तसा प्लॅटफॉर्म पण मला कधी मिळाला नाही. बालपण हे माझ्या आयुष्यातले पहिले पुस्तक जे कि प्रकाशित करत आहे. मला ईसाहित्य प्रतिष्ठानने  संधीं दिली त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार.

मी व्यवसायाने एक इंजिनिअर असून मी अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंगमध्ये सध्या असिस्टंट प्रोफेसरची नौकरी करत आहे.

माझं शिक्षण : माझं पदवी शिक्षण सोलापूरमधून झालं तर माझं १० पर्यंतच शिक्षण हे माझ्या गावात म्हणजे पिलीवला झालं. लहानपणीच्या तसेच इंजिनिअरिंगच्या बऱ्याच आठवणी आहेत ज्या मी पुस्तकरूपी लिहू इच्छिते. चेतन भगत हे माझ्यासाठी नेहमीच रोल मॉडेल आहेत आणि मी प्रयत्न करेन कि मी एक दिवस त्यांच्यासारखी यशस्वी लेखिका होईन. भविष्यात खूप प्रसिद्धी पैसे मिळावा अशी काही अपेक्षा नाही पण मी खूप काही चांगलं लिहावं आणि ते सगळयांपर्यंत पोहोचावं अशी अपेक्षा आहे. मला एक चांगली लेखिका त्याचबरोबर उत्तम वक्ता व्हायचंय आणि त्यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहीन.

सनहा पठाण

अकलूज

बालपणी ज्यांनी मला घडवलं त्या गुरुवर्यांना

व बालपणीच्या आठवणी आजही जाग्या करणाऱ्या माझ्या बालमैत्रिनींना

माझे हे पहिले पुस्तक समर्पित......

सनहा पठाण

# प्रस्तावना

माणसाच्या आयुष्यातला सर्वात महत्वाचा काळ कोणता असेल तर ते आहे बालपण. बालपण हे प्रत्येक माणसाच्या मनावर कायमस्वरूपी छाप टाकणारा व त्यातील प्रसंग, व्यक्ती आणि त्यांच्याशी निगडित असणाऱ्या गोष्टी मनात खोलवर रुजवणारा कालखंड. निरागस, स्वच्छंदी जीवन कधी जगलो असावे तर ते बालपण. अशा या बालपणात प्रत्येकाचे काही खास बालमित्र मैत्रिणी असतात, त्यांच्याबरोबर घालवलेला प्रत्येक क्षण मनाच्या कप्प्यात अजूनही साठवून ठेवलेला असतो. काही खोडकर गमतीशीर प्रसंग तर काही सुखद अनुभव मैत्रीच्या त्या नात्याला आणखीनच घट्ट करत असे. आजही त्या गोष्टी आठवल्या कि नकळत वाहत जातो त्या काळात एखाद्या नदीच्या प्रवाहासारखे. अशाच काही बालपणीच्या सुंदर गोष्टी मी ह्या पुस्तकरूपी पुन्हा जाग्या करण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या आयुष्यात माझे गुरुवर्यही तितकेच महत्वाचे आहेत जितक्या माझ्या बालमैत्रिणी. माझ्या आयुष्यात खूप काही चांगल्या गोष्टी घडवण्यात त्यांचा मोलाचा हात आहे. बालमैत्रिणीबरोबरच शाळेच्या काही हृदयस्पर्शी गोष्टी आहेत ज्यातून गुरु आणि शिष्य यांचं निस्वार्थी नातं सिद्ध होत. माझी शाळा, माझे शिक्षक, माझं गाव, माझ्या मैत्रिणी हे त्या काळातील माझ्या आयुष्यातील विशेष आणि ते विशेष मी थोडक्यात सगळयांसमोर ठेवण्याचा प्रयत्न ह्या पुस्तकातून केला आहे.

पुस्तक वाचताना तुम्हाला सगळयांना तुमचे बालमित्र, तुमचे शिक्षक, तुमचं गाव, बालपणात तुम्ही केलेले काही गमतीशीर प्रसंग नक्की आठवणार. तुम्हाला तुमच्या आयुष्यातील त्या सुंदर काळात घेऊन जाणे आणि आयुष्य खूप सुंदर आहे फक्त सुंदर आठवणी घेऊन जगलं पाहिजे हाच फक्त ह्या लिखाणामागचा उद्देश.....

सनहा पठाण

ASSISTANT PROFESSOR.

Sahakar Maharshi Shankarrao Mohite Patil Institute of Technology and Research

Shankarnagar, Akluj, Solapur

# अनुक्रमणिका


१ शिवपार्वती गार्डन

२ विहीर

३ हौसा थेरडे

४ विटा

५ पेरू

६ वनभोजन

७ निबंध

# १. शिवपार्वती गार्डन

लहानपणीच्या आठवणी ह्या थोड्या वेगळ्या असतात. बालमनावर खोलवर रुजणाऱ्या असतात. काही वर्षानंतर जेव्हा आयुष्यात काही असे प्रसंग डोकावतात कि ज्यामुळे त्या आठवणी पुन्हा जाग्या होतात. आपण त्यांना पुन्हा खत पाणी घालतो, रेंगाळतो त्याच त्याच प्रसंगामध्ये......अलगद सुखद वाटणाऱ्या या गोष्टींमध्ये आपण विलीन होऊनजातो .....वाटतं किती छान होते ते बालपणीचे, दिवस यावे कधी तरी परत.......

असाच एक प्रसंग काल माझ्यासोबत घडला. खूप दिवस झाले होते मी सिझानला कुठे बाहेर घेऊन गेले नव्हते. आज कॉलेज सुटल्यावर विचार केला, आज त्याला त्याच्या आवडीच्या ठिकाणी घेऊन जावे. अकलूज मध्ये प्रसिद्ध असे शिवपार्वती मंदिर आहे तिथे मुलांना खेळण्या करिता गार्डन आहे. गार्डनमध्ये घसरगुंड्या, झोके अशी बरीच व्यवस्था आहे जेणेकरून लहानमुले रमतहील, खेळतील आपण यांच्या चेहऱ्यावरचं हास्य बघून समाधानी होईल. साडे पाच वाजता आम्ही शिवपार्वती गार्डनला पोहोचलो. ह्यांना थोडी घाईच होती म्हणून मी सिझानचे नि ह्यांचे थोडेफार फोटो काढले. जस कि आत्ताची फॅशनच झालीय, फोटो काढल्याशिवाय ह्या पिढीची एन्जॉयमेंट पूर्णच होत नाही. हा आपला निव्वळ स्वार्थ, मग आपण लहान मुलांना फोटोपेक्षा खेळण्यात जास्त रुची आहे हे पण बहुदा विसरतो. हे गेल्यानंतर मी त्याला घसरगुंडी, झोका व बरेच काही घेऊन खेळले. लहान मुलांसोबत कित्येकदा आपल्यालाही लहानच व्हावं लागत नाही का! काही कालावधीनंतर शिवपार्वती मंदिराच्या समोर मोठी हिरवळ आहे त्यात मी त्याला घेऊन फिरत होते. फिरत होते म्हणण्यापेक्षा सिझानच्या मागे पळत होते हे जास्त योग्य वाटेल. नेमका मी त्याचा बॉल आणायचा विसरले आणि तो ज्या मुलाकडे बॉल दिसेल तिकडे पळायचा, बॉल दे असं खुणावायचा. समोरच्याने नाही दिला कि चिडायचा, हिसकावून घ्यायचा प्रयत्न

करायचा. मी त्याला समजवायचे. पण ते समजण्याचं त्याच वय नव्हतं. मी त्याला ओढून आणायचे तो दुसरीकडे पळायचा. नेहमी त्याला डान्स करायची सवय आहे. कधी ट्रॅक्टर जाताना दिसला कि ह्याचा डान्स चालू, कोणी मोबाइलमध्ये गाणी लावली तरी डान्स चालू. एवढंच काय कोणाच्या फोनची रिंगटोन वाजली तरी ह्याचा डान्स चालू. त्याला कधी मधेच आठवण झाली तरी तो उगाचच डान्स करतो. गार्डन मध्येही तो दोन्ही हाताची बोटे वर करून दोन्ही पाय जागेवरच हालवत, काहीतरी गुणगुणत, हळूच माझ्याकडे बघून हसत डान्स करत होता. अनोळखी व्यक्तीकडे पाहून पण तो डान्स करायचा. काहींना अप्रूप वाटायचं, काही हसायचे काही त्यांच्या बाळांना दाखवत म्हणायचे

"बघ तो मुलगा कसा डान्स करतोय"

परत फिरून त्याला कुठून तरी बॉल दिसायचा. वेड्यासारखा बॉल बघून कुठेही पळायचा. शेवटी मी एका मुलीकडून थोड्या वेळासाठी खेळायला बॉल घेतला थोड्या वेळाने ती छोटी मुलगी तिचा बॉल परत मागायला आली पण हा काय बॉल देईना म्हणून मी सिझानच्या हातातून बॉल हिसकावून घेऊन छोट्या मुलीचा बॉल तिला परत केला. तसं सीझू (लाडाचे नाव) चिडला, रडायला लागला, गडगड जागीच लोडायला लागला. शेवटी मी साहिलला फोन केला आणि घरचा बॉल घेऊन यायला सांगितलं पण ह्या लहान मुलांचं विशेष त्यांना दुसऱ्याकडे आहे तेच पाहिजे असतं. त्याने तो बॉल दोन मिनिटे हातात घेतला परत तो दुसऱ्यांच्या बॉल मागे पळू लागला. सात वाजून गेले होते. अंधार झाला होता. हिरवळीमुळे मच्छरांचा गॉन्ग गॉन्ग आवाज वाढला होता. म्हणून मी आणि साहिल सिझानला घेऊन परत घरी निघालो. मुख्य द्वार जिथून शिवपार्वती गार्डन मध्ये प्रवेश करतो, आम्ही बाहेर होतो व समोरून बरीच लहान मुले त्यांच्याबरोबर त्यांचे आईवडील आत येत होते, त्यात एक सुंदर महिला होती जिने खूप छान काळ्या रंगाची साडी घातली होती. मी तिला कमी तिच्या साडीला जास्त बघत होते. पहिली गोष्ट काळा रंग माझा आवडता, दुसरी गोष्ट ती साडी तिला खूप उठून दिसत होती, त्या साडीत तिचे सौन्दर्य अजून खुलून येत होते. आम्ही थोडं पुढे निघून आलतो.

तेवढ्यात साहिल म्हणाला, , , " दीदी तिकडे बघ काय म्हणतायत"

मी लगेच पाठीमागे वळून पाहिलं, ती साडीवाली स्त्री व तिच्याबरोबरच बरेच सारे थांबले होते. मला थोड्या वेळ गोंधळल्यासारखं झालं.

तेवढ्यात त्या साडीवाली स्त्रीच्या शेजारचा माणूस हसला आणि म्हणाला, "काय पुढचं निघून चाललीयेस"

मी आता पुरती गोंधळले होते तेवढ्यात पुन्हा साहिल म्हणाला, "मानेसर"

पुढे काय बोलायची गरज नव्हती, काल परवाचीच गोष्ट असल्यासारखी ते बालपण नजरेसमोरून गेलं आणि ओठावर ते हास्य आलं. मानेसर आम्हाला गणित विषय शिकवायला होते. माझ्या पाठीमागे साहिल चार वर्षांनी लहान त्यामुळे ते माझ्यानंतर साहिललाही शिकवायला होते. माने सरांनी आम्हांला सहावीचं गणित, सातवीचं गणित, संपूर्ण सातवीच्या स्कॉलरशिपची तयारीही शाळा सुटल्यावर जादा तास घेऊन करून घ्यायचे.

सरांना मी म्हणाले, , "मी बघितलंच नाही, मी ओळखलंच नाही तुम्हाला, साहिल म्हणल्यावर कळलं."

सरांच्या नजरेतून समोरचा माणूस कधीच चुकत नव्हता, समोरच्याची नजर ते बरोबर पकडायचे. माझी ही चोरी सरांनी पकडली होती हे मला सरांनी बोललेल्या दुसऱ्या वाक्यावरून समजले. सर बोलले ते असे

सर, म्हणाले "तू मॅडम कडेच बघत चाललीस, मी कसा दिसणार."

पुढे सर हसले, मला कळलं मी मॅडमकडे पाहत होते हे सरांनी पकडले. मीही चुकल्यासारखे हसले. पण त्यांच्या बायकोचा त्यांना अभिमान आहे ही गोष्ट सरांच्या बोलण्यातून

चुकत नव्हती. सरांमध्ये खूप बदल झाला होता. आम्ही सहावी सातवीला होतो तेव्हा सर नुकतेच शिक्षक म्हणून रुजू झाले होते. आता सरांच्या डोक्यावरचे केस कमी झाले होते. सरांचा चपळपण आता जाणवत नव्हता. पण एक गोष्ट सरांची आजही तशीच असणार हे माहित होतं ते म्हणजे सरांची जिद्द, चिकाटी, हुशारी व कौशल्य. सरांच्या शिकवण्याच्या पद्धतीला तोड नव्हती. आवडता विषय बनला होता गणित त्यामुळे.

मला खूप छान वाटलं कि जवळ जवळ पंधरा वर्षांनी सर मला भेटले होते पण वाईट एका गोष्टीचं वाटलं कि सर अजूनही तिथेच आहेत जिथे आम्ही शिकलो. पण मी एवढ्या वर्षात एकदाही शाळेला भेट दिली नव्हती. मी पुढे निघून गेले होते पण सर अजून तिथेच होते. कित्त्येक सनहा, तृप्ती, यास्मिन, रजनी, राधिका, स्नेहल, हीना यांना ते आजही शिकवत होते. सगळया आठवणी, सगळया मैत्रिणी एवढ्या दिवसातून आज नकळत जाग्या झाल्या. पुढे सरांनी तू काय करतेस असं विचारलं. अर्थातच सरांच्या अपेक्षा जास्त असाव्यात उदारणार्थ सरकारी नोकरी किंवा एखाद्या मोठ्या कंपनीत उच्च पदावर पण तसं काही नव्हतं. सरांना वाटणारी खंत मला कळून आली तरीही त्यांनी इंजिनिअरिंग कॉलेजवर प्रोफेसर आहे यात समाधान मानले असावे.

पुढे ते सिझानला पाहून म्हणाले, "हा तुझा का? काय नाव आहे? किती वर्षाचा झाला? मी पाहिले फेसबुकला त्याचे फोटो "

मला पुढे खूपच वाईट वाटले.सरांनी प्रत्येक विद्यार्थी लक्षात ठेवलाय आणि मी मात्र विसरले. त्यांच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त ते अकलूजला आले होते. वाढदिवस थोड्या वेगळ्या पद्धतीने साजरा करायला. केक कापण्याऐवजी अकलूज फिरवायला. योगायोग म्हणा किंवा आणखीन काही, भेट फक्त पाच मिनिटाची होती पण खूप काही आठवलं जे मागे राहिलेलं. म्हणतात मागचं सगळं विसरावं, नव्याने पुढं जावं, पण अशी माणसं का विसरायची ज्यांनी आपल्याला घडवलं. खूप आहेत ते गुरुवर्य ज्यांनी इथंपर्यंत आणलं. सुरवसे सर, अवताडे सर,

देशमुख सर, पाटील सर, शिंदे सर, जाधव सर, रेडे सर, सातपुते मॅडम, देशमुख मॅडम, जगदाळे मॅडम

म्हणून तर म्हणतात,

गुरुरब्रह्मा, गुरुरविष्णू, गुरुर देवो महेश्वराः, गुरुसाक्षात परब्रहम, तस्मैश्री गुरवेनमः




शिवपार्वती गार्डन

# २.विहीर

ही आठवण थोडी वेगळी वेगळी आहे, थोडी गंमत वाटण्यासारखी आहे, लहानपणी आपण किती वेंधळट असतो, हट्टी असतो.एखादी गोष्ट हातात घेतली कि शेवटपर्यंत किती गुंतून जायचो.. चुकीचं करतोय कि बरोबर काही घेणं देणं नसायचं फक्त आम्ही जे करतोय ते बरोबरच आणि आम्ही ते करणारच ही जिद्द होती. आत्ताच्या काळात आपण एखादे काम हाती घेतले आणि दुर्दैवाने ते नाही झालं तर चिडतो, वेळ वाया गेला पैसा वाया गेला म्हणून, कित्येक दिवस स्वतःला दोष देतो पण लहानपणी तसं नव्हतं, लहानपणी नसायची ती भीती वेळ वाया गेल्याची. अनुभवायचो पचवायचो अपयशही त्या काळात, पण जग बदलेल तसं आपणही बदललोय. रिस्क नावाचा फॅक्टर आपल्या आयुष्यात आलाय. अपयश पचवायची क्षमताच नाही. अपयशाला घाबरलो तर अनुभव कसे अनुभवणार?

इयत्ता सहावीची ही गोष्ट, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व जुनिअर कॉलेज पिलीव येथे शाळेअंतर्गत विज्ञान प्रदर्शन आयोजित होणार होते.आम्हाला जाधव मॅडम त्या वेळेस विज्ञानला होत्या. त्यांना आठवण झाली कि त्या दोन रुपये द्यायच्या भजी आण म्हणायच्या. दोन रुपयेची भजी मागायची कशी? आम्ही स्वतःकडचे तीन रुपये त्यात घालायचो एकूण पाच रुपयाची भजी आणायचो, येताना तीन रुपयेची भजी म्हणजे निम्म्यापेक्षा जास्त भजी आम्ही रस्त्यातच खायचो. आणि उरलेली भजी मॅडमला आणून द्यायचो. त्या आंम्हाला घ्या घ्या म्हणायच्या पण असायची शिल्लक तीनच भजी त्यात काय घ्यायचं आम्ही नको नको म्हणायचो, मॅडम कशी भजी खातात, हे एकमेकांकडे बघत मनातल्या मनात त्यांची निंदा करत बसायचो. कधी भजी तर कधी त्या शेतातली काळी माती आणायला पाठवायच्या. कोणाच्या घरी काळी माती आहे असं म्हणल्यावर आम्ही आहे आहे म्हणायचो तेवढंच बाहेर फिरायला भेटायचं. स्वतःच्या रानात नसली तरी शेजारी पाजारी चार पाच रान पालथी घालायचो आणि मॅडमला

काळी माती आणून द्यायचो. नशीब आमचं कि ती माती त्या आमच्या समोर खात नव्हत्या.पर्स मध्ये घालून ठेवायच्या. कधी त्या दुपारच्या सुट्टीत येऊन आमचे डबे खायच्या, आम्हाला वाईट नव्हतं वाटत, त्यावेळी आम्हाला असं वाटायचं मॅडम आम्हाला किती भाव देतात. कधीं सुट्टीच्या दिवशी त्या, त्यांच्या घरी बोलवायचा घरातील जाळया काढून घेणे, झाडू मारून घेणे असली कामे लावायच्या. आणि बदल्यात पिकून गेलेली केळी, किती तरी दिवसाचे पडलेले लाडू द्यायच्या. घरी गेल्यावर खातो म्हणत बॅगेत टाकायचो आणि फेकून द्यायचो. नंतर सगळया मैत्रिणींना हसत हसत सांगायचो, कोणी म्हणायचं मॅडमच्या डोक्यावर परिणाम झालाय, कोणी म्हणायचं त्यांचं बाळ वारल्यामुळे त्या सायको झालेत. तर कोणी म्हणायचं त्यांना बाळ होत नाही म्हणून त्या असं वागतात. कधी कधी खरंच त्या खूप विचित्र वागायच्या. वर्गावर उशिरा यायच्या तोपर्यंत आम्ही खूप गोंधळ घालायचो मग प्राचार्यांनी त्यांना झापलं कि येताना वर्गावर मोठी छडी घेऊन यायच्या. हातावर त्या कधीच मारत नव्हत्या, पहिल्या बेंच पासून ते शेवटच्या बेंचपर्यंत लाठी चार्जे केल्यासारखं लागेल तिथे लागेल आणि मारत मारत म्हणायच्या

"अभ्यास करता येत नाही? गोंधळ घालता, घालचाल का परत?"

आम्ही फक्त, "नको नको " म्हणत ओरडायचो

अशा विज्ञानच्या या जाधव मॅडम नि आम्हाला विज्ञान प्रदर्शनात एक प्रकल्प बनवायला सांगितला. पुस्तकात शोध, मोठ्यांना विचार पण मला प्रकल्प करून दाखवा आणि तो प्रकल्प प्रदर्शनात ठेवा. आमचा शोध सुरु झाला. आमच्या ग्रुपची बैठक बसू लागली. कधी यास्मिनच्या घरी तर कधी शाळा सुटल्यावर शाळेच्या कट्ट्यावर. आठवडा होत आला होता. कोणाच्या आजोबाला विचार, कोणाच्या वडिलांना विचार. कोणी म्हणायचं कंपोस्ट खताचा करा, पीक चांगलं येत ते दाखवा. कोणी म्हणायचं तुमच्या मॅडमलाच विचार कि. मग पुन्हा मॅडमला विचारायचो.त्यांचं पुन्हा तेच पुस्तक वाचा. शेवटी मला एक कल्पना सुचली, मॅडमनीच घेतलेल्या एका पाठात होत, विहिरीचं पाणी काढण्यासाठी अगोदरच्या काळात इलेक्ट्रिकल मोटर

नसायच्या, म्हणून लोक त्या काळात रहाटचा वापर करायचे. ह्या काळातही आहेच कि, विजेची बचत होतेय आणि माणसाचा व्यायाम होतोय. शेवटी सुपारी फुटल्यासारखी सगळयांचं बहुमत झालं व विहीर व त्यावरचा रहाट हा प्रकल्प करायचा ही कल्पना जाधव मॅडमच्या पुढे मांडली. जणू आम्ही थॉमस एडिसन असल्यासारखं त्यांनी आम्हाला प्रोत्साहन दिले. जवळ जवळ प्रदर्शनाला महिना राहिला असताना आमची कामे चालू झाली

आमची तुकडी फक्त मुलींची, चौथीपर्यंत शिक्षण पण मुलींच्याच शाळेत झालेलं त्यामुळे मुलांचा जास्त संबंध नसायचा. मुलीच राजे असल्यासारखं होत आमचं. सातवीपर्यंत अ तुकडीची शाळा सकाळच्या सत्रात असायची. सकाळी साडेसात ते साडेबारा त्यानंतर शाळा सुटली कि घरी यायचं जेवण करायचं. मला सकाळी अंघोळ करणं कधीच नाही जमायचं. मी जेवण केल्यानंतर अंघोळ करायचे तोपर्यंत सगळे आमच्याच घरी जमायचे. सिविल इंजिनिअर असल्यासारखं मी जमिनीवर प्लॅन आखायला सुरुवात केला. माझा प्लॅन सुरु झाला, खाली काहीतरी फरशी घेऊन त्यावर दगडाने व मातीने गोल विहीर बनवूयात. सगळं व्यवस्थित माती व शेणाने सारवूयात. वाळली कि बाहेरून मस्त टीव्हीत दाखवत्यात तस तिला कलर देऊयात. परत शिलाई मशीनवर जो बॉबी बसवतेत त्याला दोरी बसवून त्याच रहाट करूयात. खेळण्यातली प्लास्टिकची कळशी दोरीला बांधुयात. शेवटी सगळं झालं कि विहिरीत पाणी ओतुयात. सगळयांनी बरोबर बरोबर म्हणून मान हलवली. आम्ही दोघी दोघी मिळून दगडाच्या चिपळया शोधू लागलो. कोणी विहिरीला आधार द्यायला फरशी आणायला गेले. सगळयांनी सर्व काही आपल्या परीने गोळा केलं होत. मी छोटी बादली भरून पाणी आणले. फरशीवर दगडाचा एक थर रचून आम्ही मातीने थोपु लागलो. जवळ जवळ एक थर करायलाच संध्याकाळ झाली. घरातली चिल्ली पिल्ली बोलवायला येऊ लागले, " तुला काकींनी लवकर घरी बोलावलंय, नाहीतर बघतेच म्हणलीय ". तसं एक एक जण उद्या करू म्हणत जायचे.

दुसऱ्या दिवशी परत तेच, असं करत आठवडा संपला. विहिरीचा शेवटचा थर कसा बसा पूर्ण झाला. एक दिवस संपूर्ण विहीर वाळवायला ठेवली. वाळवायला ठेवलेली विहीर बघायला मैत्रिणी दिवसभर आपापल्या सवडीने यायच्या, येताना घरातील गल्लीतील लहान मुलांना घेऊन यायच्या. " ये छोट्या आम्ही विहीर बनवलीय, कशी आहे?", असं कौतुकाने सांगायच्या.तशी लहान मुलं विचारायची, " हात लावू का? " तसं आम्ही सगळे बाकीचे ओरडायचो, " ये नको तुटलं सगळंच."

विहीर पूर्ण वाळली होती. कुठे कुठे चिरा पण पडल्या होत्या. आम्ही त्यात पाणी ओतून बघितलं तर सगळीकडून पाणी बाहेर येत होत. परत हेही लक्षात आलं कि खाली जी फरशी होती ती खूपच जाड होती एवढी मोठी फरशी शाळेपर्यंत उचलून नेणार कसे, तेवढ्यात हीना म्हणाली, " आमच्या घरी पत्रा आहे, पत्र्यावर केलं तर?" आम्ही लगेच तिला घेऊन यायला सांगितलं. तेवढ्यात तृप्ती म्हणाली, " आपण मातीच्या ऐवजी सिमेंट लावू म्हणजे पाणी बाहेर येणार नाही. तेव्हड्यात स्नेहल म्हणाली, " कोठून आणणार सिमेंट?" यास्मिन नि हळूच मुद्दा सुचवला, " आमच्या गल्लीत, रस्त्याची कामे चालू आहेत, सिमेंटची रस्ते बनवतेत ते, तेथून आणू." परत तेजलचा मधेच प्रश्न उपस्थित झाला, " ते थोडीच आपल्याला देणार." हीना तेवढ्यात पत्रा घेऊन आली. आमची चर्चा अजून चालूच होती. कोणी म्हणत होतं मागायचं थोडं, द्या म्हणायचं. पुन्हा हीनाचं बोलली, " ते मागून नाहीत देणार, मला माहितीय त्यांची १ वाजता जेवणाची सुट्टी होती तेव्हा आपण त्यांनी कालवलेल्या सिमेंट मधून थोडं पळवून आणू." ही कल्पना त्या वेळी आम्हाला खूपच छान वाटली. दुसऱ्या दिवशी एक वाजायची वाटतच पाहत होते सगळे. यास्मिनच्या घरी फुटकी पाटी होती ती घेऊन आम्ही मिशन सिमेंटला निघालो. कामगार जेवायला गेलेत हे कळताच आम्ही त्यांच्या जवळच्याच साहित्याने सिमेंट पाटीत घेतले. दोन तीन जणी कोणी येत नाही ना हे बघायला थांबलेले, जशी पाटी भरून झाली पळतच ह्या गल्लीतून त्या गल्लीत गेलो. आता आमची नव्याने सिमेंटची विहीर चालली होती. चार ते पाच दिवस हा पराक्रम रोज चालू

होता. रोज सिमेंट आणून विहिरीवर थोपायचो, एकदाची विहीर पूर्ण झाली. दोन तीन दिवस पाणी मारणे, वाळवणे हा कार्यक्रम चालू होता. एक दिवस वॉटर कलर आणून मस्त कलर पण दिला. रहाट काय आपण प्रदर्शनाच्या दिवशी पण करू ते फक्त ठेवायचंय असं म्हणून आम्ही समाधानाने सुस्कारा सोडला. दुसऱ्या दिवशी मॅडमला विहीर नेऊन दाखवायची ठरलं. मॅडमच्याच तासाला मॅडम नि मान्यता दिली आणि आम्ही पाच ते सहा जणी विहीर आणायला निघालो. दोन जणी एकीकडे आणि दुसऱ्या दोघी दुसरीकडे असं विहीर घेऊन आम्ही निघालो. त्या चौघींना कंटाळा आला कि आला कि दोन दोन जणी बदलायचो. गल्ली बोळातून ही आमची आगळी वेगळी विहीर निघाली होती. शाळेपासून घराचं अंतर जवळ जवळ एक ते दीड किलोमीटर होत. गल्लीतली लहान मुलं, बायका थांबून थांबून आमची विहीर पाहत होते. शेवटी कसं बसं शाळेच्या पाठीमागे येऊन पोहचलो. मॅडम आणि बाकी मुली खिडकीतून डोकावून पाहत होते. एकच गर्दी खिडकीत झाली होती जणू आम्ही खूप मोठा पराक्रम केला होता. शाळेला वळसा घालून गेटपर्यंत आलो तशी विहिरीला एक छोटी चीर पडली. तसं मी म्हणाले, " सरका सरका मी धरते, व्यवस्थित धरा हलवू नका." शाळेच्या गेट मधून आत गेलो तशी विहिरीला एक मोठी चीर पडली आणि विहिरीचे दोन तुकडे झाले. सगळयांचा चेहरा पार पडला. तशीच आम्ही ती विहीर वर्गात नेली. सगळया मुलींपुढे स्वतःच हसू केलं, मॅडम ओरडल्या ते वेगळंच. शेवटी लटकलेले चेहरे घेऊन आम्ही ती विहीर प्रयोगशाळेत नेऊन ठेवली. पुढे मीच बोलले, " तृप्ती तुमच्या थिएटरचं बांधकाम चालू आहे ना तिथून सिमेंट आणून आपण विहिरीला लाऊयात." तसं पुढे रजनी बोलली, " आता आम्ही येत नसतो." सगळया मुली एका पाठोपाठ एक निघून गेल्या. मी मात्र तेथेच उभी होते, डोळयात पाणी होत खूप रडू वाटत होत, फक्त विहिरीकडे पाहत होते. चार पाच दिवस राहिले होते विज्ञान प्रदर्शनाला. शेवटी प्रदर्शनाचा दिवस उजाडला खूप मुलामुलीनीं भाग घेतलेला मला प्रदर्शनाला जायची पण इच्छा नव्हती. पण वर्गातल्या सगळयांना प्रदर्शन बघायला वरच्या मजल्यावर शिक्षक घेऊन गेले होते. आमच्या ग्रुप मधल्या मुली कुठे दिसतच नव्हत्या. मी मात्र वर्गातल्या इतर मुलींबरोबर गेले. दोन तीन प्रकल्प बघितल्यानंतर

आमचा ग्रुप दिसला, खूप सारे प्रकल्प घेऊन बसल्या होत्या त्या, त्यात विहीर पण होती आणि त्या वर रहाटही होता. त्या जिथे बसल्या होत्या तिथे एक स्टूल रिकामा होता. जशी मी तिथे गेले स्नेहल म्हणाली, " सनहा हा स्टूल आम्ही तुझ्यासाठी रिकामा ठेवलाय, ये चल तुझी विहीर जशी तू आम्हाला पटवून सांगितलेली तशी सगळ्यांना सांग." मला वाटलेलं माझ्या मैत्रिणींनी माझी साथ सोडली मी जिद्द सोडली होती पण शेवटी त्यांनी करून दाखवलं अशा जिद्दी मैत्रिणी कुठे पाहायला भेटतात आजकाल. हाती घेतलेलं काम नाही झालं कि आपण तिथेच सोडून देतो पण लहानपण तसं नव्हतं, ती जिद्द आजही पाहिजे, तो उत्साह आजही पाहिजे, म्हणून तर म्हणतात ना

" लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा."

पण मी थोडं वेगळं म्हणेन '

"लहानपण देगा देव, उत्साह, चैत्तन्य आणि जिद्दीचा ठेवा "



कल्पेनेतील विहीर

# ३. हौसा थेरडे

अजून एक अशीच गमतीशीर, विनोदी आणि पुन्हा पुन्हा आठवावी अशी आगळी वेगळी आठवण हौसा थेरडे या नाटकाची. ह्या नाटकाचं खरं नाव काय हे मलाही माहित नाही. मी इयत्ता चौथीत असताना फासे बाई आम्हाला शिकवायला होत्या, त्यांच्या मुलीने हौसा थेरडेची एकांकिका करून दाखवली होती नंतर आम्ही सर्व मैत्रिनींनी त्या एकांकिकेचं रूपांतर एका विनोदी नाटकात केलं. माझ्या त्या बालमैत्रिनींना ते नाटक कितपत लक्षात आहे मला माहित नाही पण मला मात्र आठवतंय जसंच्या तसं. इयत्ता सहावीत असताना आम्ही ते नाटक केलं, ते आमच्या शालेय जीवनातील पहिले नाटक त्यानंतर भरपूर काल्पनिक, काही असंच कोणाचं तरी बघून, जवळ जवळ चार ते पाच नाटकं आम्ही बसवली होती. आमच्या नाटकांशिवाय शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम पूर्णच होत नव्हता. "हौसा थेरडे", "आता तरी शांत बस", "अंधश्रद्धा निर्मूलन ", "एड्स जनजागृती", अशी आमच्या नाटकाचे शीर्षके होती. नाटकाची नावे शोधण्यापासून ते कोण काय होणार ह्याची भांडण, नंतर मीच ते लिहिणार मीच सराव घेणार त्यामुळे मुख्य पात्र मला हे माझं ठरलेलं....किती तरी रुसवे फुगवे, सराव कुठे करायचा? मधेच कोणाचा तरी विरोध अशा या अनेक कारणांना सामोरे जात शेवटी आमच्यासाठी वाजलेल्या टाळया, केलेलं कौतुक, शिक्षकांच्या नजरेत आमचा उंचावलेला मान ह्यातच आम्ही समाधानी व्हायचो. आता ते समाधान राहिलेलं नाही. आत्ताच्या काळात समाधान हे सहजासहजी मिळत कुठे? अशी मते झालीत सगळयांची. मिळत जरी असेल तरी आहे त्यात समाधानी अहो ही भावनाच कोणाजवळ उरलेली नाही. कोठेतरी मी वाचलंय

"समाधानाची शिदोरी स्वतः खावी व नंतर दुसऱ्याला द्यावी ह्यातच समाधान आहे"

गोष्टही काल पर्वाची नाही जवळ जवळ पंधरा वर्षांपूर्वीची आहे. रजनीच्या घरी आम्ही गृहपाठ करत बसलो होतो. गृहपाठात गप्पा रंगायच्या. शिकवणीचा वेळ होईपर्यंत तिथे आमचा वेळ मजेत जायचा. घरापुढेच छोटीशी बाग होती त्यात मोगरा, गुलाब, जांभूळ, पेरू अशी अनेक झाडे होती, कधी त्या झाडांच्या सावलीला निवांत अभ्यास करत बसायचो. उन्हाळ्यात तर फार गार, शांत आणि हवेशीर वाटायचं. त्यांच्या शेजारी सुरवसे गुरुजींची मुलगी

होती, तिचे नाव स्वप्ना. ती आमच्या पेक्षा एका वर्षाने मोठी होती. ती आमच्या पुढच्या वर्गात शिकत होती. स्वप्ना यायची अधून मधून काय चाललंय पाहायला. आजही ती आली होती, आम्हाला सगळ्यांना सांगत होती, "आमच्या पप्पाच्या शाळेत कसला तरी कार्यक्रम आहे, दहा, बारा जण मोठी कॉलेजची मूल मुली आलेत, दिवसभर शाळा स्वच्छ करत होते, आत्ता तीन वाजता त्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आहे, आपण कोणी पण त्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेऊ शकतो " पुढे आमचा सर्वांचा विचार झाला. आपण त्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम पाहायला जायचं. पण रजनीच्या सल्ल्याप्रमाणे मागच्या वर्षी शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात केलेला डान्स करूयात ही कल्पना सुचली.पण डान्सच्या स्टेप्स सगळया आठवत नव्हत्या. परत सुचलं, ते हौसा थेरडेचं नाटक आम्ही गम्मत म्हणून पिटीच्या तासाला सरांना करून दाखवलेलं. तर आमचं ठरलं हौसा थेरडे हे नाटक करायचं. एक वाजले होते, आज शिकवणी बुडवून नाटक करायचं असा आमचा झक्कास बेत ठरला होता.

आमची पळापळी सुरु झाली, ठरल्याप्रमाणे मुख्य पात्र मीच . म्हणजे हौसा थेरडे "सनहा पठाण" होणार आता बाकीची नावे खालीलप्रमाणे

हौसाचा नवरा "रजनी " होणार

हौसाची बहीण रूपा " यास्मिन" होणार

रूपाची मुलगी स्वाती "तृप्ती " होणार

कंडक्टर "हिना बागवान " होणार

आईस्क्रीम वाला " सोनू रोकडे " होणार

हौसाची मुलगी सपना " सोनू लेंगरे " होणार.

माझ्याकडे नाटकाला घालायला काहीच नव्हतं, शेवटी रजनीच्या आई जवळची साडी घेतली. सलवार कुर्ती घातली होती त्यावरच कशीबशी साडी नेसली. हातात रजनीच्या बांगड्या घातल्या. कपाळावर रजनीच्या आईची टिकली लावली, हौसा थेरडे तयार होती. बाकी पुरुषाचा पोशाख कोणीच घातला नाही. सगळया मुली म्हणाल्या, " कळतंय सगळयांना नाटक करायला लागल्यावर कोण आहे ते, तसं पण तूच मुख्य आहेस"

कळतंय तर कळतंय म्हणत आम्ही जायला निघालो. तृप्ती ने मात्र तिच्या पात्राप्रमाणे मांडीपर्यंत येईल एवढा स्कर्ट आणि टॉप घातला होता.

पळतच आम्ही सगळयांनी जी. प. प्रा. प्राथमिक मुलांची शाळा गाठली. हौसा थेरडे हे नाटक चालू झाले.

---

हौसाचा नवरा :" आग ये हौशे, तुझ्या भनीचं पत्र आलाय, मंबई वरण."

हौसा: " आग बया, व्हय का? वाचा बघू काय लिव्हलंय?

हौसाचा नवरा : तुला बोलावतोय मंबईला

हौसा : आग बाया मला ! नग बया, एवढ्या लाम, म्या आपल्या येशीपर्यंत तरी गेलीय का कधी, नग म्हणावं तिला.

हौसाचा नवरा: आग हौशे, चल कि यु जाऊन, सपनि ला बी घिऊन जाऊ, इव फिरून.

हौसा : असं म्हणताय, बर बर कवा निघायचं, मी गाठोडं घिती बांधायला, सामान सुमान.

हौसाचा नवरा : चल कि उद्याचं निघू.

(दुसऱ्या दिवशी हौसाचा नवरा गाठोडं बघून )

हौसाचा नवरा: आग हौशे गठुडं कसलं घितीय, ती मंबई हाय, पिशवी घी पिशवी

हौसा : राहूद्या तुमची पिशवी, आमचं गठुडंचं बर, चल सपने

(हौसा तिचा नवरा बस मध्ये बसतेत )

हौसा : आव धनी, थांबवाय लावा कि त्या माणसाला, मला कसं तरी होतंय, थोडं उचमळाल्यावानी, जीव कासावीस होतोय वो माझा.

हौसाचा नवरा : आग काय नाय होत, धर सुपारी खा.

कंडक्टर : तिकीट तिकीट तिकीट, तिकीट काढा चला

हौसा : आता ग बया ! चांगला दिसतु कि, माझ्या रुपीला द्यायला घेतलय तिखट तुला बरी दिन

हौसाचा नवरा : आग हौशे तिखट नाय ग तिकीट, पैसे द्यावं लागतंय जायचं

हौसा : असं व्हय, मी बाय गप्प बसती.

( बघता बघता मुंबई येति)

हौसा : सपने दमानं उतीर. पढायचो बया आपुन ह्यातुन.

(खाली उतरल्यानंतर हौसा )

हौसा : आव धनी धनी, आग सपने इकडं व्हा इकडं

हौसाचा नवरा : आता काय झालं हौशे?

हौसा( बिल्डिंग कडे पाहत ) : ही किती व एकावर एक रचल्याती, पडतील कि अंगावर

हौसाचा नवरा : ह्याला बिल्डिंग म्हंत्याती हौशी ह्यातानि मानस राहत्याती, ही पडत नसतीया, भक्कम असतीया.

हौसा: असं व्हय, मी बाय गप्प बसती.

(हौसा बहिणीच्या घरचा दरवाजा धड धड वाजवत )

हौसा : ही वेळ हाय नव्हं, दरवाजा लावायची, काय बया ईपरीतच

हौसाचा नवरा : आग हौशे, मंबईला दिवसा बी अन रात्री बी लावत्यातीच दरवाजा, तसं धड धड नाय करायचं, ही बेल असती ती वाजवायची.

हौसा : असं व्हय, मी बाय गप्प बसती.

( दरवाजा उघडल्यावर रूपा गळे पडती )

रूपा : हौशे, हौशे किती दिवसांनी भेटतोय

( हौसा तिचा हात काढत )

हौसा : तुकडा उतरवला न्हाय कि, काय न्हाय, काय बया सगळं ईपरीतच.

रूपा: आग इथे  असंच असत

हौसा : बर बया, मी बाय गप्प बसती.

( हौसा खाली फरशीवर बसते )

रूपाचा नवरा : अहो उठा उठा वर बसा

हौसा : नग नग, ती लय फुग्यावर बसल्यावानी वाटतंय, मी बया हितच बसती

( तेवढ्यात रुपाची मुलगी येते, हौसा तिच्याकडे रागाने पाहत म्हणते )

हौसा : चप्पल कुठं हाय ग रूपे माझी, हिच्या वढते पायावर जोराची, काय घातली ग ही कापड, इकून खाल्ली कि काय?

स्वाती : आंटी, मुंबईची फॅशन आहे हि, मम्मी....

हौसा: अन काय म्हणती मम्मी का समी, आय म्हणायचं, जा कापडी दुसरी घालून यि, काय बया रूपे कसलं वळण लावलीय, माझी बघ गुणाची पोर.

( हौसाला आईस्क्रीम खायला नेतात )

हौसा : आय आय ग, तुझा मुडदा बसिवला, तुझी तिरडी उचलली, कसलं झनानतंय ग बया

हौसाचा नवरा : आग हौशे ही  असंच असतय

हौस : व्हय बया, मी बाय गप्प बसती

( हौसेला मूवी पाहायला नेतात )

हौसा ( जोर जोरात रडत ) : बया, कसं झालं ग, चांगला व्हता कि, असा कसा गेला, ( हुंदके देत)

रूपा : आग हौशे तो खरं नाही गेला, पिच्चर मध्ये दाखवत्याती तसं

हौसा : असं का बया, मी बया गप्प बसती

हौसा ( पुन्हा जोर जोरात हसत ) : हा हा हा हा

हौसाचा नवरा : आग हौशे ती उग उग हसतीय, तू कशाला हसतीय.

हौसा : बर असुद्या मी येडी, मी बया गप्प बसती.

( दुसऱ्या दिवशी हौसा गाठोडं बांधते, मुलीला आणि नवऱ्याला घेऊन रूपाचा निरोप घेते )

हौसा : रूपे मला नाय बया मंबईत जमत, उग माझ्या मूळ तुझा अपमान, मी जाती बया, माझ्याकडनं काय चुकलं असाल तर पदरात घे

रुपा : आग असं काही नाही, तू अजून चार दिवस राहा.

हौसा : नग, आग रूपे बस आता, भावजी तुम्हीच या गावाकडं चार दिस, गरीबाच जगन बघा

रूपाचा नवरा : अहो ताई, असं काही नाही, तुम्ही अजून थोडे दिवस राहा

स्वाती : राहा न ग मावशे

हौसा : नग बाळा, तूच यि आई वडिलाला घिऊन

अशा या हौसा थेरडे नाटकाला अकरा रुपयेचा बक्षीस मिळालं. NSSला आलेल्या मुलांनी तोंड भरून कौतुक केलं. प्रत्येकानी येऊन काँग्रट्स म्हणत आमचं कौतुक केलं. त्यावेळी अभिनंदनाचा एकच शब्द माहित होता, काँग्रॅच्युलेशन. जेव्हा ती शेक हॅन्ड करत काँग्रट्स म्हणत होती, तेव्हा आम्हाला काँग्रेस ऐकू येत होत. मीच नव्हे तर सगळ्यांना वाटत होत. हे काँग्रेस पार्टीचे आहेत. पण ते काय म्हणाले ह्या पेक्षा आम्हाला मिळालेलं बक्षीस आणि केलेलं कौतुक हे महत्वाचं होत. त्यावेळी अकरा रुपये हे या वेळच्या अकराशे रुपये पेक्षा जास्त वाटत होते

आम्हाला. शेवटी आम्ही एकाच जल्लोष केला. अकरा रुपयेची भेळ आणली आणि परत रजनीच्याचं घरी जाऊन हसत गप्पा मारत कॉंग्रेस कॉंग्रेस म्हणत खिल्ली उडवत खात होतो.

ते होत बालपण. बालपणीच नाटक, बालपणीचीन आठवण, कितीं निरागस होत ते जग ते जीवन.

म्हणून मीच लिहिलेली बालपण ह्या कवितेतल्या चार पंक्ती

"बालपणीची आठवण जणू जन्मभराची साठवण,

बालपणीची आठवण जणू आयुष्यभराची साठवण

बालपणीच्या अंगणात होतो फार सुखी,

अंगणाचे अंतर झालं कमी तसं माणूस झालाय दुखी."

# ४. विटा

जसा पांडुरंग एका विटेवरी पंढरपुरात आपल्या भक्तांसाठी उभा आहे तशीच आमची नवीन शाळा आम्ही उचललेल्या विटेवर उभी आहे. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलिपे जुनिअर कॉलेज ही आमची नवीन शाळा. आजही आसपासची असंख्य मुलंमुली तिथूनच ज्ञानाची शिदोरी घेतायेत. अशा या शाळेची एक आठवण अजूनही मनात मोरपिसाऱ्यासारखी साठवून ठेवली आहे. शाळेच्या त्या आठवणी सांगता सांगता कधी त्या क्षणात विरून जातो कळतच नाही.

आम्ही पिलीवच्या स्टॅन्डच्या बरोबर पुढेच असणारी आमची जुनी शाळा कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व जुनिअर कॉलेज इथे शिकत होतो. पाचवी ते दहावी हे शिक्षण आमचं तिथेच झालं. पाचवी ते सातवी सकाळ सत्र व आठवी ते दहावी दुपार सत्र. अकरावी बारावी आर्ट सकाळी, अशी शाळेची वेळ ठरलेली.आम्ही आठवीतून नववीत आलो आणि माझ्या लाडक्या प्राचार्यांची बदली झाली जे कि मला "आमची कन्या" म्हणायचे. नवीन प्राचार्यही तितकेच चांगले होते. शाळेची गावाबाहेर, पेट्रोल पंपजवळ जमीन आहे हे त्यांना कळताच व दोन्ही सत्रात शाळेच्या दोन वेळेमुळे होणारा मुलांचा त्रास लक्षात घेताच त्यांनी नवीन शाळा बांधायची हा निश्चय ठाम केला. निधी, फंड, गावकऱ्यांकडून थोडी मदत, मोठ्या पुढाऱ्याकडून मदत, संस्थेकडून थोडा हातभार या ना त्या परीने पेट्रोल पंपाजवळ भूमिपूजन झाले. आम्ही दहावीत जाईपर्यंत शाळेचं बांधकाम जोमाने सुरु झाले. खंत एवढीच होती आम्ही दहावीत त्यामुळे आमचं शेवटचं वर्ष, आम्हाला नवीन शाळेत शिकायला भेटणारच नव्हतं.

एके दिवशी नेहमीप्रमाणे आम्ही शाळेच्या वेळेत आलो. आल्यानंतर कळले कि शिक्षकांचं ट्रैनिंग असल्यामुळे जवळ जवळ निम्म्यापेक्षा जास्त शिक्षक साताऱ्याला गेलेत. जाधव सरांनी आम्हाला नवीन शाळा पाहायला जाऊयात असं आम्हाला सांगितले. दोन दोन रांगा करून आम्ही जुन्या शाळेपासून निघालो. जुन्या शाळेपासून नवीन शाळा जवळ जवळ दोन किलोमीटर अंतरावर शिवाय रस्ता हा मेन रोड, सातारा सोलापूर रोड, वाहने जास्त त्यामुळे सावकाश चालत आम्ही नवीन शाळा गाठली. आम्ही जेवणाचे डबे, पाण्याच्या बाटल्या आवर्जून घेतल्या होत्या. माझा शाळेला यायचा जायचा मार्ग तिथूनच होता त्यामुळे खालचा मजला बांधून पूर्ण

झालाय हे मला माहित होत. सगळ्या विद्यार्थ्यांना जाधव सर वरच्या मजल्यावर घेऊन गेले तिथे बांधकाम चालू होत, त्यांनी आम्हा सर्व विद्यार्थ्यांना प्रेमाने सांगितलं, " बाळांनो, ही तुमची नवीन शाळा, मला माहितीय हे तुमचं शेवटचं वर्ष, तुम्ही इथे पुढच्या वर्षी शिकायला येणार नाही येणार, अर्थात हा तुमचा वैयक्तिक प्रश्न, कारण मी पुढच्या वर्षी इथे आर्ट बरोबर सायन्सही चालू करतोय. किती जरी केलं तरी तुम्ही माझे सगळ्यात लाडके, हुशार मुलं, समजूतदार मुलं, आमचा आदर ठेवणारी मुलं तुम्ही. तुमच्या वर्गाचा मला नेहमीच अभिमान वाटतो. म्हणून मला असं वाटत, एक शाळेबद्दल छोटीशी आठवण, नवीन शाळेला तुमचं बहुमूल्य योगदान म्हणून आपण सर्वजण इथे थोडं श्रमदान करूयात, मीही तुमच्याबरोबर आज इथे काम करणार आहे " आम्ही कुठलीही लाज, मुभा न बाळगता खालून वरपर्यंत रांग केली, . सरही आमच्या बरोबर विटा वाहत होते. एक ते दीड तास आम्ही न थकता जोमाने, जिद्दीने काम करत होतो. मधेच कोणाला तहान लागायची, पाच दहा मिनिटे विश्रांती. काहींना काम नको असायचे ते दुसरीकडे जाऊन टाईमपास करायचे. पण सरांनी कोणाला जबरदस्ती केली नव्हती.

थोड्या वेळाने विटा वाहत असतानाच अचानक विट माझ्या पायावर पडली. मी धाडकन खाली बसले. पायापासून गुडघ्यापर्यंत जोराच्या मुंग्या आल्या. डोळयातून नकळतच पाणी येऊ लागले. मुलींनी कसं बस धरून खालीपर्यंत आणलं पाणी प्यायला दिलं. मी रडतच होते, तेवढ्यात जाधव सर व शिंदे सर आले ते बोलले ते ऐकून माझं सगळं दुखणं जणू पळूनच गेलं.जाधव सर म्हणाले, "अगं बाळा, काही होत नाही. बघू कुठं लागलं. लहान बाळासारखा रडतीयेस काय. धाडशी आहेत माझ्या मुली, त्या एवढ्याश्या लागल्याने घाबरतात कि काय?

पुढे शिंदे सर म्हणाले, " ती घाबरत नाही, होय कि नाही? अगं मुलींनो काहीं वर्षांनी जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराबरोबर शाळेसमोरून जाचाल तेव्हा सांगाल कि ही आमची नवीन शाळा, ह्या शाळेच्या विटा आम्ही उचललेत, होय कि नाही?"

सगळे जोर जोरात हसू लागले मीही स्मित हास्य केलं पुढे ते मला हसवायच्या हेतूने चिडवत म्हणू लागले, "सनहा अजून पुढे म्हणेल मी पायावर विट पण पडून घेतलेली, रडत पण होते मुळूमुळू."

परत मी हसू लागले. सरांनी दोन मुलींसोबत मला दवाखान्यात घेऊन गेले. सुदैवाने फ्रॅक्चर नव्हतं.मुक्का मार होता. सरांनी नंतर मला घरी नेऊन सोडलं.

अशी आमची नवीन शाळा जिच्या विटा आम्ही उचलल्या, पायावर पाडूनही घेतल्या आणि सरांना सांगितल्याप्रमाणे आज येता जात जोडीदाराला सांगतो, " ही बघा आमची नवीन शाळा, तिच्या विटा आम्ही उचललेत, मी पुढे थोडं जास्त सांगते, " पायावर पाडूनही घेतलेत " पुढे हे मला चिडवायचे हेतूने म्हणतात, " तिथे कोणावर राग काढत होती."

आजकालच्या पिढीला बघून असं वाटत कि शाळेविषयी ती आपुलकी तो जिव्हाळा आजकालच्या पिढीत राहिलेला नाही. आज शाळेचा भाग म्हणून एखाद काम विध्यार्थ्यांना सांगितले कि विद्यार्थ्यांबरोबर पालकही चिडचिड करतात, " आमची मुलं शिकायला येतात कि काम करायला " अशा वाक्यात शाळेची शिक्षकांची अवहेलना करतात. शाळा म्हणजे नुसतं पुस्तकी ज्ञान नसून एक चांगला माणूसही घडवला जातो हे कळणारे थोडेच. शिक्षणाबद्दल आपुलकी, प्रेम, आदर आजच्या पिढीत राहिलेलं नाही.शिक्षक विद्यार्थी यांच्यातलं नातं दुरावत चाललं आहे, म्हणूनच कि काय शिक्षणाचा बाजार होत आहे. आता नाही कळायची ह्या विद्यार्थ्यांना आपल्या शाळेची शिक्षकांची किंमत, वाया चाललेली पिढी ही ह्यांना काय कळणार गुरुवर्यांची किंमत.



जुने विद्यालय

आई वडिलांनंतरचा पहिला नमस्कार घालायचो ते शिक्षक,

आदराने दोन्ही हात जोडून गुरुर ब्रह्मा, गुरुर विष्णू म्हणायचो ते शिक्षक

गणितापासून इंग्रजीपर्यंत, लिहायला बोलायला शिकवले ते शिक्षक

ज्यांनी घडवलं, एक चांगला माणूस व भारताचा सुजाण नागरिक बनवलं ते माझे आदरणीय शिक्षक............



आमचं नवीन विद्यालय



नवीन विद्यालय

# ५. पेरू

शाळेत जेवढं आम्ही शांत, अबोल, हुशार वाटत होतो त्यापेक्षाही कितीतरी जास्त खोडकर, अगाव आणि मस्तीखोर होतो याचं चांगलं उदाहरण म्हणजे पेरू. शाळेतील पहिले पाच नंबर हे आमच्या ग्रुपचे कधी मी पहिली तर कधी रजनीचा पहिला आणि माझा दुसरा, तृप्तीचा तिसरा तर सोनूचा चौथा, हिना पाचवा ही नंबरची सिरीज आमच्याकडेच. शिवाय सांस्कृतिक कार्यक्रमाचा वारसा असलेला ग्रुप आमचा. आजच्या काळात म्हणायचं झालं तर नाव होतं आमचं शाळेत, स्टेटस होतं, हवा होती, रुबाब होता वेगळाच. शिक्षकांच्या नजरेत हुशार व आदर्श विद्यार्थी आम्ही. बाकी सगळया शाळेत ऑल राउंडर ग्रुप म्हणून फेमस आम्ही. रांगोळी स्पर्धा म्हणलं कि ग्रुप मधल्या तृप्ती यास्मिनचा नंबर ठरलेला त्यांच्या पाठोपाठ उरलेले नंबर पण आमचेच, चित्रकला स्पर्धेत पण त्या दोघीं नंतर मी रजनी असायचोच, ग्रुप डान्स मध्ये आमच्याच ग्रुपचा नंबर. नाटक म्हणलं कि आमच्या शिवाय शोभाच नव्हती. निबंध स्पर्धेत माझा पहिला नंबर ठरलेला. भाषण स्पर्धेत परत मीच. इंग्लिश बोलण्यात बागवान हिना कुठल्या फॉरेनरला मागे टाकेल अशी फ्लुएंट इंग्लिश बोलायची. अशा या ग्रुपची खोडकर दंगेखोर अशी व्यक्तिरेखा साहजिकचं कोणाला पचण्यासारखी नव्हती.

कार्यानुभव, पर्यावरण आणि चित्रकला हे विषय आले कि त्या तासाला वर्गातले मागचे दोन बेंचेस जोडायचे आणि हातात उगीचचं वही पेन घेऊन मागे जाऊन बसायचो. वही पेन बेंच वर, बेंचच्या खालच्या कप्प्यात आमचे वाटाणे, चिंचा, बोरं, पेरू ठरलेली असायची. सरांनी फळयाकडे तोंड केलं कि वाटाणा तोंडात परत त्यांची नजर चुकुवत वाटाणा फोडायचा परत त्यांनी आपल्याकडे पाहिलं कि, " जैसे थे "रोजच आमचा हा ठरलेला कार्यक्रम, आम्हाला वाटायचं आम्हाला कोण पाहत नसणार, पाहतही असतील पण आपलेच विद्यार्थी म्हणून माफही करत असतील. कधी चुकून माकून सर मागे आले तर लिहायची ऍक्टिंग करायचो. खाऊ वर रुमाल झाकायचा. उगीच सरांना जाणीवपूर्वक एखादा प्रश्न विचारायचा जेणेकरून सरांना वाटावं ह्यांचं किती लक्ष आहे. पेरूच्या सिझन मध्ये तर ठरलेला नित्यकर्म दुपारची सुट्टी झाली कि पेरू आणायला जायचं आठाने, एक रुपया व मोठा पेरू दोन रुपया ठरलेला. कोणाचा पेरू किती छान याची पण स्पर्धा असायची. मोठा, हिरवा, थोडा खडबडीत, कडक असा पेरू छान तो दोन

रुपयेपर्यंत मिळायचा. आम्ही पेरू कापून कधीच घेत नव्हतो अक्खा घ्यायचो. एक एक तुकडा दाताने कुरतडून काढायचो आणि खायचो. किती गोड आहे हे दाखवण्यासाठी एकमेकिंना द्यायचो. तो पेरू सहसा आम्ही दुपारनंतरच्या तासाला खायचो. दुपारनंतर नेहमी कार्यानुभव, पर्यावरण, पिटी हेच तास असायचे.

त्या दिवशी कार्यानुभवचा तास होता निंबाळकर सर म्हणून नुकतेच बदली होऊन आलेले शिक्षक कार्यानुभवला होते. सर थोडे वयस्कर होते. दुसरा ते तिसरा तास होता त्यांचा त्यामुळे फार काही ओळख पण नव्हती. सर एक पुस्तक घेऊन यायचे, वाफे वगैरे काढून दाखवायचे फळयावर, नंतर कोणातरी एकाला पुस्तकातून सांगायला लावायचे आणि आम्ही लिहायचो. ठरल्याप्रमाणे आमचा ग्रुप पाठीमागेच बसला होता आणि साथ द्यायला पेरू होताच त्यात सर नवीन आम्ही जास्तचं मजेत. लिहून काय घेतोय हे आम्हालाच नाही कळायचं. त्या विषयाचा पेपर पण नसायचा त्यामुळे आम्ही जास्त मनावर नव्हतो घेत. आमचा कार्यक्रम चाललेला खाली मान घालायची पेरूचा एक तुकडा तोडून घ्यायचा आणि हळू हळू चघळायचा. दोन्ही बाक जोडल्यामुळे मी मध्ये बसलेले सेफ झोन मध्ये आणि त्यामुळे मी गाफील होते. सर अधून मधून चकरा मारायचे. एकदम कडेला हीना बागवान होती सरांनी तिला पकडलं तिचा हातून पेरू हिसकावून घेतला व त्यानंतर त्यांनी आम्हाला सगळयांनाच उभं केलं. सगळ्यांचे पेरू गोळा केले आणि खिडकीतून बाहेर फेकून दिले. सगळयांना पुढे बोलवलं. अपराध्यासारखे खाली माना घालून आम्ही पाच जणी उभ्या होतो.

सर, " लाजा वाटत नाही का तुम्हाला, तास चालू असताना असले घाणेरडे प्रकार करताना.मधली सुट्टी असती ना जेवायला, असले धंदे करायला पाठवतात का पालक तुमचे. नावं सांगा तुमची?"

( दोन मिनिट वादळापूर्वीची शांतता पसरली )

मी : सनहा शब्बेकदीर पठाण

हीना : हीना मौला बागवान

रजनी : रजनी दत्तात्रय भैस

तृप्ती: तृप्ती सुनील बुगड

यास्मिन : यास्मिन नवाज काझी

नशीब राधिका व स्नेहल आज नव्हत्या. आरोपीने नाव सांगितल्यावर जज असल्यासारखं पुन्हा सरांच चालू झालं...

सर: शाळेत कशाला येता शिकायला कि टिवल्या टवाळक्या करायला, किती टक्के पडलेत, बघू तुमचे दिवे, कोण आहे वर्गाचा पहिला, सांगा ह्यांची मार्क?

मी : सर मीच आहे

सर: अरे बापरे! तूच आहेस का, किती टक्के?

मी:८५%

सर ( हीना कडे पाहत): तुला ग?

हीना : ७८%

रजनी : ८४%

तृप्ती: ८० %

यास्मिन : ७५%

सर : सगळ्या हुशार विद्यार्थिनी तुम्ही असं का वागता? चांगलं दिसत का हे. बाकीच्या मुलीनीं काय आदर्श घ्यायचा तुमचा ?शहाण्या मुली आहेत तुम्ही असं नाही करायचं. परत खाणार का तासाला काही?

आम्ही : नाही नाही खाणार

सर : चला आता शहाण्यासारखं बस जागेवर

सरांच्या बोलण्याचा तेव्हा काहीच परिणाम झाला नसावा. पेरू गेल्याच्या दुःखात कधी तास संपला कळलंच नाही. सर बाहेर गेले नंतरचा तास पिटीचा होता. सरांनी मैदानावर यायला सांगितले. सगळ्या मुली गेल्या आमचं पेरूचं दुःख काही केल्या जाईना. पळतच पांच जणी खिडकीच्या बाहेर गेटमधुन गेलो. पेरू तसा स्वच्छचं होता खाल्या जागी थोडी माती लागलेली. तृप्ती बोलली, " तसा घाण नाही झाला धुऊन खाउयात." तसं पटापट सगळ्यांनी हा

तुझा हा माझा करत घेतला. शाळेच्या टाकीजवळ नेऊन नळाखाली धुतला. पेरू खात खात मैदानावर गेलो

आताही जेव्हा पेरू खातो तेव्हा तोच पेरू आठवतो. खिडकीच्या बाहेर पडलेला. पेरू त्यावेळी जेवढा रुचकर लागला आता नाही लागत त्यात हट्ट पण होता, जिद्द होती, खट्याळ असं मन होत त्यानंतर पेरू खाल्ला नाही असं नाही फक्त त्या सरांच्या तासाला नाही खाल्ला. त्यानंतर बाकीच्या सरांसारखाच आमचा ग्रुप निंबाळकर सरांचा आवडता झाला. आजही पेरू पाहिला कि खूप साऱ्या आठवणी डोळयासमोरून जातात निंबाळकर सर, आठाने, एक रुपया, दोन रुपयेचं महत्व..........



पेरू

# ६. वनभोजन

वनभोजन म्हटलं कि आलीच असेल सगळयांना शाळेची आठवण. जसा काळ उलटत चाललंय वनभोजन हा शब्दच पुसत चाललंय. आजकालच्या विद्यार्थ्यांच्या तोंडून वनभोजन हा शब्दच ऐकायला मिळत नाही.ट्रिप, विझिट,ट्रेक यासारखे पाश्चात्य शब्द फक्त ऐकायला मिळतायेत. खरं तर शाळांबरोबर कॉलेज मध्ये पण वनभोजन ही संकल्पना राबवायला हवी. निसर्गाच्या सानिध्यात आवर्जून केलेल्या वेगवेगळया अन्नाची चव घेणे त्या जेवणाला राजदरबारातील पंचपक्वानाची पण सर येणार नाही. हेच क्षण माझ्यासारखी विद्यार्थिनी दहा पंधरा वर्षांनी आठवते तेव्हा वेगळाच आनंद मिळतो. काय हरकत आहे जिथे आपण सध्या काम करत आहोत तिथे ही संकल्पना राबवायला, हा विचार नकळत मनात येऊन जातो. म्हणतात ना इतिहास वाचावा, शूर वीर पुरुषांच्या कर्तृत्वान गोष्टी ऐकाव्यात आपल्या आयुष्याला वेगळे वळण वेगळी दिशा द्यायला मदत होते. तसेच आहे भूतकाळाचेही आपल्या भूतकाळातील काही आठवणी नव्याने जाग्या कराव्यात भविष्यकाळात कुठे ना कुठे फायदा नक्की होतो. अशीच एक शालेय जीवनातील वनभोजनाचा गोष्ट नकळत आज आठवणीत आली.

माझ्या शालेय आयुष्यात मी तीन ते चारदा वनभोजनाला गेले. पहिली ते चौथी दोनदा व पाचवी ते दहावी दोनदा पण ते दिवस माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस ठरले. वनभोजनासाठी प्राथमिक मराठी शाळा असो किंवा कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय लहान मुलांसाठी म्हणजे पहिली ते सातवी पिलीवचा डाक बंगला ठरलेला ते म्हणजेच पिलीवचं गेस्ट हाउस. मोठ्या मुलांसाठी म्हणजेच आठवीच्या वरच्या महालक्ष्मी मंदिर ठरलेलं. सहसा वनभोजन हे मंदिराच्या पायथ्याला, नदीकाठी किंवा निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या धार्मिक स्थळी, तळे अशाच ठिकाणी असतात. आमचा डाक बंगलाही निसर्गाच्या सानिध्यातच आहे. मोठी मोठी चिंचेची झाडे, आवळा, आंबा, पेरू, सीताफळ, नारळाची झाडे मधेच एखादे लाल रंगाने नटून गेलेलं गुलमोहरचं झाड डाक बंगल्याची शोभा जास्तच वाढवत असे. निलगिरीची मोठं मोठी झाडे त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळायचा. रंगीबेरंगी फुले, हिरवळीचे गवत एवढं निसर्गाने समृद्ध अजून कुठली जागा असणार वनभोजनासाठी.झाडांची दाटी एवढी होती कि मधोमध असणारा बंगला बाहेरून दिसत नसे. त्याला डाक बंगला का म्हणायचं हे मला अजूनपरी समजलं नाही.

त्या भागातल्या मुली म्हणायच्या डाक बंगल्यात भूत असतात. तेव्हा ते खरं वाटायचं घाबरायचोही पण आत्ता कळतंय शेवटी ते बालपणचं.

डाक बंगल्यात जागोजागी पाण्याचे नळ काढलेले होते. प्रत्येक झाडाला लाल कलरच्या तिरकस विटांचे कुंपण, झाडांच्या मधून संगमरवरी फरशीचा बनवलेला रस्ता होता. तिथे गेलं कि मन शांत, विचार शुद्ध आणि प्रसन्न असा अनुभव यायचा.

सहावीत असताना आदल्या दिवशीच मॅडम नि आम्हाला, " उद्या वनभोजन आहे तरी घरून चांगलं चुंगलं घेऊन या आपण निसर्गाच्या सहवासात बसून उद्याचा एक दिवस आनंदात घालवूयात " असं सांगितलं. एवढ्या मुलांना तिथे जाऊन जेवण बनवण्यापेक्षा आम्हाला घरूनच घेऊन यायला सांगायचे ह्याचा फायदा असा व्हायचा सगळयांच्या डब्याला वेगवेगळे पदार्थ असायचे त्यामुळे खूप साऱ्या पदार्थाची चव आम्हाला साऱ्यांना घेता यायची. ठरल्याप्रमाणे सकाळी दहा वाजता आम्ही हजर झालो. आज मम्मी माझ्यासाठी लवकर उठलेली तिने माझ्यासाठी शेंगाच्या पोळया, दही, बेसनाचे पोळी नको म्हणत असताना चार चपात्या, काकडी, गाजर, सफरचंद आणि पेरू न विसरता पाण्याच्या दोन बाटल्या आवर्जून दिलं होत. कर्मवीर भाऊराव पाटील व जुनिअर कॉलेजची मुलं ज्या त्या वर्गाप्रमाणे व्हरांड्यात रांगा करून उभी होती. पाटील सर सगळयांना माईक मधून सूचना देत होते, " इथून डाक बंगल्यापर्यंत सर्वांनी शिस्तीत जायचे आहे. रोडवर वाहने खूप असतात ज्या त्या वर्ग शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवायचे आहे. गोंधळ, गडबड नको. कोणाचं काय विसरलं असेल तर आत्ताच घेऊन या तिथे गेल्यावर माघारी जातो, घेऊन येतो ही कारणे नकोत."

सरांनी सांगितल्याप्रमाणे अगोदर पाचवीचा वर्ग त्यांच्या मागे सहावी त्याच्या मागे सातवी या क्रमाने रांगेत जायचं होत. ज्या त्या वर्गाबरोबर जे ते वर्गशिक्षक राहिलेले दोन शिक्षक एकदम पुढे दोन सर्वांच्या पाठीमागे अशी आमची पदयात्रा निघाली.जाताना मुलींच्या गप्पा, चेष्टा मस्करी चालूच. मधेच आम्ही मुली मोठ्याने घोषणा द्यायचो

" एक दोन तीन चार

कर्मवीर शाळा छान छान "

" भारत माता कि जय "

" झाडे लावा -झाडे जगवा "

मधेच मुलांमधून कोणीतरी ओरडायचे

' आवाज कोणाचा, कर्मवीर शाळेचा

आवाज कोणाचा, कर्मवीर शाळेचा "

मग पुन्हा आम्ही सुरु करायचो

"एक रुपया चांदीचा, सारा देश गांधींचा "

" ज्ञानाचा दिवा, घरोघरी लावा "

" शिकलेली आई, घर पुढे नेई "

" अडाणी आई - घर वाया जाई"

" अडाणी बाप - डोक्याला ताप"

शाळेपासून डाक बंगल्याचं अंतर हे जेमतेम एक किलोमीटर त्यामुळे घोषणा देत देत कधी डाक बंगला यायचा कळायचं नाही. रस्ता ओलांडताना मात्र सर्व शिक्षक चांगलीच खबरदारी घ्यायचे, येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना हात करून थांबवायचे. सगळ्या मुलांनी रस्ता ओलांडेपर्यंत रस्त्याचा रस्ता रोको असायचा. डाक बंगल्याच्या गेट मधून आत गेलो कि सगळ्यांना रांगा करून खाली बसायला लावायचे. शाळेतून येताना राष्ट्रगीत झालेलं असायचं. इथे आल्यानंतर आम्ही पसायदान किव्वा प्रार्थना म्हणायचो

" आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञे तोषावे ।

तोषोनि मज ज्ञावे । पसायदान हे ।

शेवटच्या ओळी आम्ही खूप मोठयाने व फास्ट म्हणायचो

येथ म्हणे श्री विश्वेशराओ, हा होईल दान पसावो

येणे वरे ज्ञानदेवो सुखिया जाला

सुखिया जाला हे चार ते पाच वेळा म्हणायचं आणि मान खाली जमिनीला टेकवायची असं आमच्या शाळेचा नियम होता. त्या नंतर दोन्ही हात मांडीवर ठेऊन ताठ बसायचं, ओम ह्या स्थितीत. डोळे मिटायचे. दोन मिनिट पिन ड्रॉप साइलन्स डोळे उघडल्यानंतर खूप प्रसन्न शांत वाटायचं. त्यानंतर कोणाला बोधकथा, चिटकुले, जोक सांगण्यासाठी सर पुढे बोलवायचे. त्यावेळेस कोणी लाजायचे नाही. सांगायचे काही ना काही. आमच्या पुढच्या वर्गात अजय नष्टे म्हणून नष्टे गुरुजींचा मुलगा होता आज तो डेप्युटी कलेक्टर आहे हे आमच्या शाळेचा भाग्याचं, त्याने एक खूप सुंदर बोधकथा सांगितली ती अशी

अनेक महापुरुषांनी सांगितलेले उपाय करुन थकलेला एक तरुण विवेकानंदांजवळ आला नि म्हणाला, “स्वामीजी तासन् तास बंद खोलीत बसून मी ध्यानधारणा करतो, परंतु मनाला शांती लाभत नाही.” त्यावर स्वामीजी म्हणाले, ” सर्वात प्रथम खोलीचा दरवाजा उघडा ठेव. आपल्या जवळपास राहणाऱ्या दुःखी, रोगी व भुकेल्या माणसांचा शोध घे. त्यांना यथाशक्ती मदत कर.” यावर त्या तरुणाने त्यांना, ” एखाद्या रोग्यासी सेवा करताना मीच आजारी पडलो तर ” असा प्रश्न विचारला. विवेकानंद म्हणाले, ” तुझ्या या शंकेमुळे मला असे वाटते की, प्रत्येक

चांगल्या कार्यात तुला काहीतरी वाईट दिसते. शुभकार्यास वेळ लावू नये तसेच त्यात उणिवाही शोधू नये. हाच शांती मिळवण्याचा मार्ग आहे. सगळयांनी टाळयांचा एकाच कडकडाट केला.

त्यानंतर आमच्या वर्गातल्या तृप्तीने एक जोक सांगितला

“दोन वेडे रस्त्याने जात असतात. तिथूनच एक ट्रक दुसऱ्या ट्रकला दोरीने ओढून नेत असतो ते बघून एक वेडा दुसऱ्या वेड्याला म्हणतो, "लोक बघ ना किती वेडे आहेत एक दोरी न्यायला दोन ट्रक वापरतायेत “

त्याचबरोबर हास्याचा एकच जल्लोष झाला.

असच कोणी काही प्रसंग कोणी जोक्स तर कोणी गोष्ट सांगत होत. त्यानंतर सगळे जेवायला बसणार होते. सगळे हात धुऊन आले दोन मोठे गोल केले होते एक मुलींचा तर दुसरा मुलांचा. मुलींबरोबर सगळया मॅडम जेवायला बसलेल्या व मुलांबरोबर सगळे सर. तू काय आणलय, मी काय आणलय करत सगळे एकमेकांना आपल्या डब्यातले पदार्थ देऊ लागले. आमच्या डब्याच्या टोपणात सगळयाचे थोडे थोडे पदार्थ घेऊन सरांना व मुलांना दिले त्यांनीही आम्हाला दिले. एकाच पंक्तीत खूप सारे पदार्थ आम्ही फार आवडीने खात होतो. वनभोजनाचा आस्वाद पुरेपूर घेत होतो. कोणाच्या डब्यात अळूच्या वड्या, कोणाच्या डब्यात पिवळा फोडणीचा बटाटा, कोणी इडली सांबर, कोणी वांग्याची भाजी, कोणी शेंगा चटणी, कोणी श्रीखंड पुरी तर कोणी चपाती भाजीबरोबर कुरवड्या पापड्या मधेच कोणीतरी कुरकुरे चिप्सचे पुडे उघडायचं, कोणी तोंडी लावायला लिंबाच लोणचं, आंब्याचं लोणचं, खरे शेंगदाणे, काकडी, गाजर. मुलांमध्येही कोणाचे धपाटे, मेथीचं पिठलं, तीळ लावलेली बाजरीची भाकरी, कोणी जाम आणि चपाती कोणी पालक पराठे, मेथी पराठे अशा कितीतरी पदार्थांची चव एकाच वेळी घेणारे आमच्यासारखे नशीबवान आम्हीच. काही पदार्थ खूप दिवसातून खात होतो तर काही पहिल्यांदाच खात होतो. गेल्यावर आईला हा पदार्थ करायला लावायचं हे मनातल्या मनात ठरतं होत, मधेच कोणाचातरी बेसन लाडू चिवडा यायचा. रोज दहा ते पंधरा मिनिटात जेवणारी मुलं आम्ही, आज दोन ते तीन तास फक्त जेवणच करत होतो याची कल्पना कोणाला नसेल.

जेवण तर खूपच छान झालं होत. सगळे सुस्त झाले होते. जेवण झाल्यावर कोणी चिंचेच्या झाडाखाली तर कोणी आंब्याच्या झाडाखाली निवांत बसले होते. चेष्टा मस्करी, गप्पा गोष्टी करत कधी एक दिड तास संपला कळलंच नाही. जवळ जवळ तीन वाजत आले होते नंतर

आम्ही आवळा, गाबोळया झालेल्या चिंचा दगडाने पाडत, पडलेल्या चिंचा वेचून खाण्यातच अर्धा तास घालवला. नंतर थोडा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. नेहमीप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम हे आमच्या ग्रुप शिवाय होणारी गोष्टच नव्हती. आम्ही पुन्हा तेच हौसा थेरडेचं नाटक रंगरंगोटी करून पुन्हा त्या ठिकाणी सादर केल. टाळयांचा कडकडाट झाला. कोणी शिक्षकांची नक्कल करत होतं तर कोण काही. सुरवसे मॅडम नि खूप छान गाणे गायले त्यांचा आवाजही खूप सुरेख होता. "ऐरणीच्या देव तुला ठिणगी ठिणगी वाहू दे, आभाळागत माया तुझी आम्हा वरी राहूदे " हे सुंदर गीत मराठीत आहे हे आम्हाला तेव्हा कळले. नंतर लिंबू चमचा, खो-खो, कब्बडी मुलांसाठी क्रिकेट अशे कितीतरी खेळ आम्ही खेळलो. आता निघायची वेळ झाली होती पण निघावं असं आम्हाला वाटत नव्हतं. शेवटी परतीची यात्रा निघाली. वाटेत कोणाचं घर असेल तर घरी जाण्याची परवानगी सरांनी दिली होती. जाताना मात्र अंगात त्राण नव्हता निवांत चाललेलो. मेंदू काम करत नव्हता पाय फक्त चालत होते. दिवसभर खेळून चालून एवढं दमलो होते कि रात्री कधी झोप लागली कळलंच नाही.

असा एक दिवस थोडं इतर दिवसांपेक्षा वेगळा काहीतरी नवीन असावा. अशी वनभोजनाचा आठवण झाली कि वाटत जावं कधीतरी निवांत वेळ काढून. नक्कीच यात जी मजा आहे ती तुमच्या शिमला कुल्लू मनालीच्या ट्रिप मध्ये पण नाही. आपल्याला नेहमी मोठमोठ्या गोष्टीच आकर्षण असतं, त्या नादात आपण छोट्या छोट्या गोष्टीत येणार आनंद हरवतोय हे कळतंच नाही. पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार करत आपली संस्कृती किती परकी होत चाललीय हेच कळत नाही फाईव्ह स्टार हॉटेल मध्ये जाऊन ब्रेकफास्ट डिनर करण्यापेक्षा एक दिवस वनभोजन करणे कधीही आनंददायी व फायदेशीर ठरेल.

## ७. निबंध

पहिली ते दहावी निबंध कोणाला चुकला नाही. सगळयांनी आपल्या शालेय जीवनात निबंध हा लिहिलाय. पहिला निबंध जवळ जवळ सगळयांनीच "माझी आई " हाच लिहिला असेल. त्यानंतर " माझी शाळा ", "माझं गाव ", " माझे आवडते शिक्षक ", " माझा मित्र " ', " परीक्षा बंद झाल्या तर.... ", " मी पंतप्रधान झालो तर....."', "झाडाची आत्मकथा ", " मी कलेक्टर झालो तर ", " साक्षरता एक अभियान " अशा अनेक विषयावर मराठीत निबंध हा असायचाच. थोर महात्मे, नेते होऊन गेले त्यांच्यावरही निबंध असायचे, " महात्मा ज्योतिराव फुले " " महात्मा गांधी " " स्वामी विवेकानंद ", " महाराष्ट्रातील संत ", " मराठी भाषा " असे अनेक निबंध आपण शालेय जीवनात पाहिले. बाजारात निबंधाची पुस्तके भेटायची सगळे विकत घ्यायचे, वाचायचे परीक्षेत लिहिताना सोपं जावं म्हणून. माझं हे विशेष मी पुस्तकातलं वाचून कधी निबंध नाही लिहिला. मनात असणारे लाखो करोडो शब्दच माझ्या निबंधात असायचे. त्यामुळेच बहुतेक मला लिखाणाची आवड निर्माण झाली. निबंध हाच माझ्या विचाराला कल्पनेला दिशा देणारा माझ्या आयुष्यातील महत्वाचा भाग आहे. मी आज जे काय लिहिलंय ते त्या निबंधामुळेच. पाया मजबूत असायला हवा हे वाक्य काही खोटं नाही. माझा पाया निबंधामुळेच पक्का झाला आणि त्यामुळेच ही फुल ना फुलाची पाकळी मी तुमच्यासमोर मांडू शकले. मीही पहिला निबंध " माझी आई " हाच लिहिला होता पण तो कसा लिहिला होता हे जर मी तुम्हाला सांगितलं तर तुम्ही हसणार नक्की.

आमचं घर हे रानात, शाळा गावात, जि. प.प्रा. मुलींची शाळा इथे मी इयत्ता तिसरीच्या वर्गात शिकत होते. आम्हाला सुरवसे बाई शिकवायला होत्या. मी तशी हुशार होते पण हुशारीबरोबर एक योग्य दिशा लागते ती बहुतेक मला त्यावेळी मिळाली नव्हती. ज्या गुरुजींच्या मुली, गावात राहणाऱ्या मुली होत्या त्या शाळा सुटल्यावर शिकवणीला जायच्या, त्यामुळे बाई जे शिकवायच्या ते त्यांना अगोदरच झालेलं असायचं. त्यामुळे शाळेत त्या हुशारी मारायच्या. त्या हुशार असं बाईंचा पण निष्कर्ष. पहिली ते चौथी मुलांची शाळाही मुलींच्या शाळेमागेच होती. मुलामुलींची मिळून शाळेत निबंध स्पर्धा आयोजित केली होती. बाईंनी हुशारी मारणाऱ्या मुलींना आदल्या दिवशीच निबंधाची तयारी करून यायला सांगितलं होतं. कोरे

कागद, पेन, पॅड घेऊन त्यांना बाजूच्याच वर्गात होणाऱ्या निबंध स्पर्धेत जायला सांगितले. बाईंना नेहमी त्याच का हुशार वाटतात म्हणून माझ्या मनात राग होताच मी बाईंना म्हटलं, " मला पण निबंध स्पर्धेत भाग घ्यायचाय?" बाईंनी माझ्याकडे पहिले आणि म्हणाल्या, " वाचलंय का काही तू? येईल का तुला लिहिता?"

वाचलं वगैरे काही नव्हतं तरीही मी होकारार्थी मान हलवली. बाई मला स्पर्धेच्या वर्गात घेऊन गेल्या आणि खिडकीशेजारी बसवले. त्या अधून मधून खिडकीतून पाहायच्या. मी फळ्यावरचे निबंधाचे शीर्षक वाचले

१. माझी आई

२. माझी शाळा

३. माझं गाव

४. माझे आवडते शिक्षक

ह्यापैकी एक निबंध लिहायचा होता. मी कागदाच्या मधोमध नाव टाकले " माझी आई " व खालीलप्रमाणे लिहू लागले

माझी आई

माझी आई खूप चांगली आहे. ती सगळयांच्या आईपेक्षा चांगली आहे. सकाळी ती खूप लवकर उठते, अंघोळ करते, झाडलोट करते, माझ्यासाठी चहा नाश्ता बनवते.

मी एवढंच लिहिलं होतं कि खिडकीतून बाई ओरडल्या, ”असा लिहितात का निबंध समास सोडून लिही” त्यावेळी मला माहितीच नव्हतं समास काय असतो ते. माझ्या शेजारीच माझ्या वर्गातल्या हुशारी मारणाऱ्या मुली होत्या त्या मला हसत होत्या. बाईनी त्यापैकीच एकीला मला दाखवायला लावले. माझा बालपणापासून स्वभाव होता कि मला दुसऱ्याचं बघून

कधीच काही करायला आवडत नव्हतं. मी फक्त तिने समास कसा सोडलाय एवढंच बघितलं बाकी सारा निबंध मला जमेल तसा लिहीत होते. ती मला अंघोळ घालते, वेणीफणी करते, माझा डबा करते. इथून तिथून आईची दिनचर्या सांगितली. शेवटचं वाक्य होतं " अशी आई सर्वांना मिळो " कसं बसं पहिलं पान व दुसऱ्या पानाचा अर्धा भाग भरला होता बाकीचे सगळे लिहीतच होते. मी निबंध जमा केला आणि वर्गाच्या बाहेर आले. आमच्या वर्गात गेलेच नाही बाई ओरडतील म्हणून. फार अपानास्पद वाटत होतं, मला स्वतःचीच लाज वाटत होती, निबंध लिहिता येत नाही म्हणून.

चौथीत गेल्यावर फासे बाई म्हणून नवीन बाई आल्या खरं तर त्यांनी आमच्या शिक्षणाला वेगळंच वळण लावलं. इंग्रजी शब्दार्थ पाठ करून घेणे, निबंध लिहून घेणे, भाषण पाठ करून घेणे, स्कॉलरशिप साठी जादा तास घेणे. इंग्रजी पोएम गट करून रोज म्हणून घेणे या सगळयाचा खूप फायदा झाला आम्हाला. गणितामधली रुची त्यांच्यामुळेच वाढली आमची. आता मी शाळेच्या हुशार विद्यार्थिनी मध्ये होते. माझा निबंध स्पर्धेत दुसरा नंबर आला होता. बाईंनी खूप छान सराव करून घेतला होता. कोणाला शिकवणी लावायची गरज नव्हती. मी पुन्हा तोच निबंध लिहिला होता " माझी आई " जास्त आठवत नाही पण थोड्या पंक्ती आठवतात

माझी आई

"आई कल्पतरू

आई सौख्याचा सागरू"

"स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी "

आई हा पहिला शब्द, जो कि आपण प्रथम बोलायला शिकतो. आई ने आपल्याला नऊ महिने नऊ दिवस स्वतःच्या उदरात जपलेले असते. आणि अतोनात हाल अपेष्टा सहन करून जन्माला घातलेलं असतं. अशा आईला मी म्हणेन

"आई थोर तुझे उपकार "

कुंभार ज्याप्रमाणे चिखलाच्या गोळयाला मटक्याचे रूप देतो त्याप्रमाणे नऊ महिने ती माउली आपल्याला घडवते.

अशाप्रकारे खूप छान कितीतरी वाक्प्रचार, कवितेच्या पंक्ती वापरून अलंकारिक भाषेत लिहिलेला तो निबंध होता. तेव्हा मला कळले थोड्या कवितेच्या पंक्ती, थोर व्यक्तींचे महान विचार व थोडी अलंकारिक भाषा असली कि छान निबंध होऊन जातो. पुढे मी स्वतः निबंध लिहू लागले. मला एक प्रकारची आवड निर्माण झाली. मला एवढंच वाटतं, बरं झालं पहिला निबंध लिहिता आला नाही, नाहीतर मी पुढे एवढं सगळं लिहूच शकले नसते. एखादी वाईट गोष्ट आपल्यासोबत घडली कि आपल्याला वाटतं कि ते माझ्याच सोबत का होतं आपण दुःखी होते, रडत बसतो, स्वतःला दोष देतो पण जे होतं ते चांगल्यासाठीच हेही तेवढंच खरं. त्याच्यावर मला एक कविता सुचतीय

तिसरीच्या वर्गात मी
अगदीच होते मठ्ठ
लिहायला सांगितलं निबंध
सर्वांचं काळीज झालं लठ्ठ
कुठून सुरुवात करावी
काही सुचेना
समास काय असतो
आम्हाला ते पण कळेना
हो ना म्हणता म्हणता
आमचा निबंध तयार झाला
बाईंनी सगळयांना वाचून दाखवला
माझा जाम पोपट झाला
पण बरं झालं तेव्हा लिहिता नाही आला
नाही तर आज हा लेख नसता आला



जी. प. प्रा. मुलींची शाळा पिलीव

# आभार

माझ्यात नकळत लिखाणाची आवड निर्माण करणाऱ्या माझ्या वडिलांचे,

तसेच लिखाणाला प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या पतीचे

व हे पुस्तक लिहिताना ज्यांनी मोलाची साथ दिली त्या माझ्या सहकारी प्राजक्ता मेखले यांचं मनपूर्वक आभार.

सनहा पठाण

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी कसलं भारी आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते फ़ालतू असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

## एक प्रसन्न अनुभव